**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स सिनर्जिया लाईफ सायन्सेस प्रायव्हेट लिमिटेड. गट क्रमांक/एस क्रमांक ६५, हिस्सा क्रमांक २, पाईकी गाव, गाटेश बुद्रुक, तलाठी सज्जा, कोणे, तालुका - वाडा, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात विस्तारिकरण एकूण उत्पादन क्षमता ७.५० टीपीए (ईसी उत्पादने) आणि ७८३.९० टीपीए (नॉन-ईसी उत्पादने) प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स सिनर्जिया लाईफ सायन्सेस प्रायव्हेट लिमिटेड. गट क्रमांक/एस क्रमांक ६५, हिस्सा क्रमांक २, पाईकी गाव, गाटेश बुद्रुक, तलाठी सज्जा, कोणे, तालुका - वाडा, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात विस्तारिकरण एकूण उत्पादन क्षमता ७.५० टीपीए (ईसी उत्पादने) आणि ७८३.९० टीपीए (नॉन-ईसी उत्पादने) प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी सोमवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०२२ रोजी दुपारी १२.३० वाजता पाथारे मंगल

कार्यालय, २ रा मजरा, विवेक नगर, वाडा, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री देविदास कोपरकर, उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री दिलीप गुट्टे, अपर जिल्हादंडाधिकारी, पालघर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, तहसीलदार - वाडा तहसील, जिल्हा-पालघर, श्री बाबासाहेब कुकडे, प्रभारी प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक यांनी सांगितले कोविड-१९ संसर्गजन्य साथीच्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून केंद्र व राज्य शासनाने काही निर्देश पारित केलेले आहेत. त्यानुसार प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सूचना केली.

आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मेसर्स सिनर्जिया लाईफ सायन्सेस प्रायव्हेट लिमिटेड. गट क्रमांक/एस क्रमांक ६५, हिस्सा क्रमांक २, पाईकी गाव, गाटेश बुद्रुक, तलाठी सज्जा, कोणे, तालुका - वाडा, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात विस्तारिकरण एकूण उत्पादन क्षमता ७.५० टीपीए (ईसी उत्पादने) आणि ७८३.९० टीपीए (नॉन-ईसी उत्पादने) प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग अ ५ (एफ) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य

जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली येथील विभागातील तज्ज्ञ समितीस प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर केला व त्यास अर्जास प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली ऑनलाईन मंजूरी दिनांक २०-०४-२०२२ रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, पालघर यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास सोमवार , दिनांक २९ ऑगस्ट , २०२२ रोजी मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-५७/२०२२ ,व्दारा पत्र

क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२२०८१२-एफटीएस-०००९ दिनांक १२-०८-२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, पालघर किंवा त्यांचे प्रतिनिधी अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,कल्याण-३ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण | - | **आयोजक** |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, कल्याण-३, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक दैनिक वृत्तपत्र सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र फ्री पेस यात इंग्रजीत जनसुनावणीबाबत जाहिर सूचना दिनांक २८-०७-२०२२ रोजी जाहिर सूचना प्रकाशित

केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर

२) जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पालघर

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, पालघर

५) उप विभागीय अधिकारी-वाडा, तालुका-वाडा,जिल्हा-पालघर

६) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय-कल्याण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, श्री सिध्दीविनायक संकूल, तिसरा मजला, ओक बागेजवळ, स्टेशन रोड, कल्याण (पश्चिम) - ४२१ ३०१, जिल्हा-ठाणे

७) उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, श्री सिध्दीविनायक संकूल, तिसरा मजला, ओक बागेजवळ, स्टेशन रोड, कल्याण (पश्चिम) - ४२१ ३०१, जिल्हा-ठाणे

८) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

९) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,

१०) तहसीलदार, तहसील कार्यालय,वाडा,, जिल्हा- पालघर,

११) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वाडा, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर,

१२) सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत,गातेश बुद्रुक, तलाठी साजा, कोणे, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर

१३) संकेतस्थळ, म.प्र.नि.मंडळ

आजतागायत उपरोक्त प्रकल्प विस्तारिकरणास समर्थन करणारी ७० पत्रे म.प्र.नि. मंडळास ईमेलव्दारे व पत्राव्दारे प्राप्त झालेली असून सदरहू प्रकल्पाविषयी एक आक्षेप प्राप्त झालेला असून त्याच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली

यांना सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना, कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) निधी व कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी (सीईआर) निधी याबाबत माहिती दिली.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आले. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की प्रकल्पाबाबत आपल्या पर्यावरणविषयक विचार,

सूचना वा आक्षेप आहेत, त्या थोडक्यात मांडाव्यात. सूचना किंवा आक्षेप नोंदविताना आपले नाव व गावाचे नाव सांगावे.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-**

**१) श्री भास्कर लडकू दळवी, राहणार-मुक्काम पोस्ट- पावनी पाडा, गातेश बुद्रुक, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर:**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आम्ही गेले अनेक वर्षे या प्रकल्पाविरुध्द तक्रारी करत आहोत. मधल्या काळात प्रकल्पाविरुध्द कारवाई झालेली आहे. ब-याच सुनावण्याही झालेल्या आहेत. पूर्णपणे पावनी पाडा हा परिसर आहे, त्यात सांडपाणी जाऊन बोअरिंग | |

| | | |
|---|---|---|
| | विहिरी आणि विहिरी प्रदूषित झालेल्या आहेत. पाण्याचा आणि शेतीचा प्रश्न हा मोठा आहे. गेले अनेक वर्षे तक्रारी करुन प्रदूषणाचा बंदोबस्त झालेला नाही किंवा प्रदूषण थांबलेले नाही. त्या परिसरात पूर्णपणे प्रदूषण आहे. | |
| २) | जर प्रकल्प प्रवर्तक प्रतिपादन करतात ही सदरहू कार्यरत प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण प्रकल्प आहे, तर आताचे प्रदूषण हे कोणाचे आहे? कारण आजूबाजूला दुसरी कंपनी नाही. सदरहू कंपनीबाबत तहसीलदारांकडेही ब-याच वेळी बैठका झालेल्या आहेत. लोकशाही दिन वेळीही सदरहू कंपनीच्या प्रदूषणाबाबत तक्रारी उपस्थित करण्यात आलेल्या आहेत. प्रकल्प प्रवर्तक जे | |

| | | |
|---|---|---|
| | आश्वासन देतात, त्याची अंमलबजावणी करत नाहीत. या प्रकल्पाचा मालक कोण आहे? ग्रामपंचायत अधिनियमांनुसार ग्रामसभेत दि. १५-०६-२०१६ ला या कंपनीच्या विरुध्द ठराव मंजूर झालेला आहे. वारंवार विनंती करुनही प्रकल्प प्रशासनाने काहीही केलेले नाही. प्रकल्पाविरुध्द दंडात्मक कारवाईसाठी प्रकल्पाचा वीजपुरवठा खंडित करण्यात आलेला होता. | |
| ३) | कंपनी चालवावी. कंपनी बंद करण्याचा आमचा हेतू नाही. पण कंपनीचा मालकाने ग्रामस्थांसमोर यावे. त्याच्याशी ग्रामस्थांबरोबर चर्चा घडावी. कंपनीतील खाजगी कंत्राटदार पुढे येतात, मात्र मालक येत नाही. | |

| | | |
|---|---|---|
| | कंपनीच्या मालकाने प्रदूषण कमी कसे होईल, सांडपाणी व्यवस्था याबाबत ग्रामस्थांशी चर्चा करावी. गेले अनेक वर्षे आम्ही तक्रारी करत आहोत. पावसाळ्यात एवढी बिकट परिस्थिती असते की कोट बांधली तरी पाणी थांबत नाही. येथे कोणे गावात एक ग्लॅव्हनायझिंग कंपनी होती, तेथे acid असायचे, ते acid इथे टाकले, तर ४००-५०० मीटर्स जात असे. गावाच्या आत विहीरी, बोअर्स असतील तर मुरलेले पाणी विहिरीत जाणार. | |
| ४) | आमच्या पावनी पाड्यात ३-४ बोअर विहिरी असतील. एकाही विहिरीचे पाणी स्थानिक पित नाहीत. अन्न शिजवितानाही ते पाणी ग्रामस्थ वापरत नाहीत. पावनी पाडाच्या | आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी प्रकल्प प्रवर्तकांनी कंपनी मालकांनी ग्रामस्थांची चर्चा न करणे, स्थानिकांच्या विनंतींना असहकार |

| | | |
|---|---|---|
| | वरच्याबाजूसही गॅल्व्हनायझिंग कंपनी असून उताराला सर्व पाणी जाते. याचा गांभीर्याने कोणीही विचार केलेला नाही. पावनी पाडा हा पुर्णपणे आदिवासी पाडा आहे. तेथील परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. कारण तेथील गरीब आदिवासी हा प्रदूषणामुळे मरणार आहे. याची कधिही विचार करण्यात आलेला नाही. हा वाडा तालुका हा केमिकल झोन नाही. केमिकल झोन हा खानिवली भागात आहे, तेथे या प्रकल्पाचे स्थलांतर करण्यात यावे. तरी कंपनी मालकाने पुढे य़ेऊन ग्रामस्थांना, ग्रामसभेत प्रदूषणाबाबत विश्लेषण करावे. अनेक ठराव प्रकल्पाविरुध्द संमत झालेले आहेत. पालघर जिल्हा हा आदिवासीबहुल जिल्हा असून पेसा कायद्याची | करणे याबाबत स्पष्टीकरण देण्याची सूचना केली. प्रकल्पाचे अधिकारी यांनी उत्तर दिले की सदरहू प्रकल्प हा खाजगी मर्यादित म्हणजे Private Limited Company असून येथे एक मालक नसतो. येथे संचालक मंडळ असते. त्यात ८-१० सभासद असतात. प्रकल्प प्रवर्तकांनी तक्रारीबाबत स्पष्टीकरण दिले की पावसाचे पाणी हे वाहतच जाते. आयोजक यांनी कंपनीच्या मालकाबाबत स्पष्टीकरण देण्याची सूचना केली, त्यावेळी प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की तिघेजण हे भागीदार (Partner ) असून एक डॉ. मेहता, दुसरे डॉ डिसुझा आहेत. त्यावेळी आयोजक यांनी एक भागीदाराची वेळ ठरवून ग्रामस्थांबरोबर चर्चा करण्याची सूचना केली. त्यास |

| | | |
|---|---|---|
| | येथे अंमलबजावणी झालेली आहे. पेसा कायद्यांतर्गत गावाला जे अधिकार दिले, त्यानुसार ठराव ग्रामसभेत संमत झालेले आहेत. ते संमत ठरावांची अंमलबजावणी होत नसेल, तर ते या जिल्हयाचे दुर्दैव आहे. | प्रकल्प अधिकारी यांनी होकार दिला. |
| ५) | पंचायत समिती सदस्य श्री अमोल पाटील यांनी मांडलेले अहवाल हे खोटे ठरले. ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी असून आरोप प्रत्यारोप चालू आहेत. प्रक्लपात काम करणारे कायम स्वरुपी आहेत की कंत्राटी आहेत याचाही विचार व्हावा. त्यांचे भविष्य काय आहे? स्थानिकांना कायम स्वरुपी रोजगार देण्यात यावा. ही आमची मागणी आहे. जर कोणी फंडिग मागत असेल, तर त्याची नांवे द्यावीत. | आयोजक यांनी प्रकल्प प्रशासनास सूचना केली की स्थानिकांना रोजगारात कायमस्वरुपी करणार वा कसे याचे उत्तर देण्यात यावे. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की श्री दळवी यांनी ज्या मागण्या केल्या त्या योग्यप्रकारे मांडल्या आहेत. त्याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल. काही कामे ही विशेष कौशल्याची असतात त्यासाठी त्या व्यक्तीच रोजगारात घ्यावी लागतात. आम्ही स्थानिकांना कायमस्वरुपी करणारच आहोत. मात्र |

| | | |
|---|---|---|
| | लोकशाही दिनात आम्ही प्रश्न मांडले. आम्ही प्रशासनास जाब विचारणारे आहोत. प्रदूषणाच्या अभ्यासासाठी एक समिती गठित करण्यात यावी. | कायमस्वरुपी माणसे नेमणे शक्य नसते, तेथेच कंत्राटी पध्दत येते. आम्ही वचन देतो की शक्य त्या ठिकाणी कायमस्वरुरी रोजगार देण्यात येईल. |

२) <u>श्री परशुराम शंकर गोतारणे, राहणार-कोने, हरणेपाडा, तालुका-वाडा, जिल्हा-पालघरः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या कंपनीला लागूनच आमची शेती आणि घरे आहेत. दोन वर्षांपुर्वी परिसरात वासाच्या उपद्रव (दुर्गंधीचा) त्रास होत होता, त्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार केली. त्याप्रमाणे दुर्गंधीमध्ये ८०% फरक झालेला आहे. मात्र अजूनही २०% त्रास | आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उत्तर दिले की संबंधित तक्रारदारांच्या तक्रारीची नोंद घेण्यात येऊन म.प्र.नि.मंडळ कल्याण कार्यालय यांनी आपण, शेतकी अधिकारी यांच्या समोर पुनश्च एकवेळा दिवस व वेळ निश्चित करुन पाहणी करुन पाण्याचे नमुने गोळा |

| | | |
|---|---|---|
| | आहे. वासाच्या उपद्रव दिवसा नसतो. मात्र संध्याकाळी ७-८ च्या दरम्यान वासाचा उपद्रव (दुर्गंधी) होतो. | करण्यात येतील. आपण पाण्याचा एक नमुना घेऊन आपण दुस-या कुठल्याही प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठवू शकता. आपला प्रश्न सोडविण्यात येईल. आयोजक यांनी प्रकल्प प्रवर्तकांना याबाबत उत्तर देण्याची सूचना केली. |
| २) | त्याचप्रमाणे जे दूषित पाणी आहे, त्याबाबत मी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे अर्ज देऊन माहिती मागविली. त्याठिकाणी तक्रार करत असताना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न येतो. कारण आम्ही ज्या बोअरवेलचे पाणी पितो, त्यालागून असलेले शेत तळे आणि एक विहिर आहे. ही जी तीन प्रकारची पाण्याचे स्त्रोत आहेत, त्या पाण्याचे नमुने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने गोळा केले आणि | प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की श्री परशुराम गोतारणे यांनी उपस्थित केलेल्या तक्रारीची आम्ही गंभीर दखल घेत आहोत. संबंधित तक्रारदार हे भागधारक आहेत. सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे प्रकल्प विस्तारिकरणासाठी जो खर्च करणार आहोत, त्या खर्चातील बहुतांश हिस्सा हा प्रदूषण नियंत्रणासाठीच वापरला जाणार आहे. कार्यरत प्रकल्प हा शून्य द्रव निस्सारण म्हणजे झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे. म.प्र.नि.मंडळ वेळोवेळी आमच्या |

| | | |
|---|---|---|
| | त्याचा अहवाल आम्हांला काल प्राप्त झाला. त्या पाण्यामध्ये म्हणजे तीन्ही स्त्रोतांमध्ये - बोअर वेल, तलाव व विहिर या पाण्यात एवढे क्षार आहेत की त्या क्षाराचा दुष्परिणाम आमच्या जीवनावर होतो. तरी पाण्यातील क्षारांचे प्रमाण कमी करावे. | प्रकल्पातील पाण्याचे नमुने गोळा करत असते. सदरहू प्रदूषणात आमच्या प्रकल्पाचा सहभाग नाही. तरीसुध्दा यात काही त्रुटी असेल, तर आमची सर्व त्रुटी दूर करण्याची तयारी आहे, याची नोंद पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी घ्यावी ही विनंती. |
| ३) | आता गेले वेळी तक्रार केली होती की पावसाचे पाणी बंद झाले नाही, तर काही प्रमाणात ते पाणी जमिनीत मुरुन ते आमच्या शेततळ्याकडे येते. आजही प्रत्यक्ष पाहणी केली, तर तळयाच्या बाजूस एक खड्डा आहे, त्यात पाणी मुरले आहे, ते काळेकुट्ट पाणी खड्ड्यात पडलेले आहे. त्याची आजही पाहणी करावीत. तेच पाणी जवळील तलावात मुरत आहे. दोन वर्षे आम्ही त्या | |

| | | |
|---|---|---|
| | तलावात मत्स्य बीज टाकतो, एकही मच्छी त्या तलावापासून मिळत नाही. | |
| ४) | तिसरा प्रश्न जी शेती आहे, त्याबाबत तक्रार आम्ही तहसीलदारांकडे केलेली होती. शेतीचे पीक आल्यानंतर पाहणी झालेली नाही. त्याच्यानंतर पाहणी झाली. त्यावेळी अहवाल हा निरंक म्हणजे NIL Report देण्यात आला. | |
| ५) | आमची मागणी आहे की प्रकल्प चालवा, पण हे बाहेर होणारे प्रदूषण आहे, हे निश्चितपणे थांबलेच पाहिजे अशी मी ह्या व्यासपीठास आणि प्रदूषण नियंत्रण मंडळास कळकळीची विनंती करतो. आज जे क्षाराचे पाणी मी, आम्ही पितो, त्यामुळेच त्याठिकाणी डेंग्युचा रुग्ण सापडलेला आहे. आमची मागणी आहे की आजच पाहणी | |

| | | |
|---|---|---|
| | करण्यात यावी, म्हणजे आपल्या ती गोष्ट लक्षात येईल. तरी परिसरातील आरोग्यविषयक बाबींबाबत सदरहू कंपनीने त्वरित कार्यवाही करावी अशी मी विनंती करतो. | |

३) **<u>श्री मधुकर पांडुरंग गोतारणे, राहणार-कोने, हरणेपाडा, तालुका-वाडा, जिल्हा-पालघरः-</u>**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | बैठकीत मी लेखी निवेदन दिलेले असून त्याबाबत योग्य | प्रकल्प प्रवर्तक यांनी पुढील कार्यवाही निश्चित करण्याचे आश्वासन दिले. |

| | | |
|---|---|---|
| | ती पुढील कार्यवाही करण्यात यावी. | |

**४) <u>श्री रंजन रघुनाथ पाटील, राहणार-नेरोली, तालुका-वाडा, जिल्हा-पालघरः-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरणात विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काय करणार हे सांगितले. पण सद्या कार्यरत प्रकल्पात प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा, सुरक्षितता, स्वच्छता याबाबत काय उपाय योजना कार्यान्वित केल्या याबाबत काहीही माहिती दिलेली नाही. पर्यावरण सल्लागार यांनी काही स्लाईडस इतक्या घाईत सांगितल्या की | |

| | | |
|---|---|---|
| | स्थानिकांना त्या समजल्या नाहीत. | |
| २) | विस्तारिकरण हे सिंथेटीक ऑरगॅनिक कंपनीचे आहे की सिनर्जिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे आहे?कार्यरत कंपनीचे विस्तारिकरण आहे वा नवीन कंपनी स्थापित करणार याबाबत स्थानिकांना कळले नाही. प्रदूषण नियंत्रणाच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी केल्यास, वाडा तालुक्यात एकही कंपनी चालणार नाही, ही वस्तूस्थिती आहे. २००९ साली येथे औद्योगिक क्षेत्र घोषित व अधिसूचित करण्यात आले, मात्र कंपन्या या वाडा तालुक्यात कोठेही स्थापन करण्यात आल्या. याची सकारात्मक बाजू म्हणजे स्थानिकांना रोजगार मिळाला. | |

| | | |
|---|---|---|
| | तर हे कार्यरत प्रकल्प बंद करणे शक्य नाही. तरी सर्व प्रकल्पांनी पर्यावरणविषयक नियमांची काटेकोरपणे पालन करावे. प्रकल्पाच्या शेजारील शेतक-यांनी त्यांच्या व्यथा मांडल्या. तर त्यांच्या अडचणींकडे दुर्लक्ष करण्यात आलेले असेल, पण वाड्यात औद्योगिक क्षेत्र घोषित व अधिसूचित करण्यात आले, त्यामुळे येथे प्रगती दिसते. स्थानिकांचे जीवनमान उंचावले आहे. | |
| ३) | जरी विविध प्रकल्पात रोजगार मिळाला, तर सीएसआर निधी हा त्या क्षेत्रातच वापरण्यात यावा. त्याचप्रमाणे पर्यावरण नियमांचा अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी, जेणेकरुन स्थानिक शेतक-यांचे नुकसान होऊ नये. येथे | |

| | | |
|---|---|---|
| | स्थानिक शेतक-यांनी त्यांच्या व्यथा मांडल्या, त्याचवेळेस प्रक्लप हे कार्यरत राहवे हीच मागणी केलेली आहे. | |
| ४) | प्रकल्पासाठी भूगर्भातील पाणी उपसा केल्याने परिसरातील पाण्याची पातळी ही खाली गेली आहे, त्यासाठी नदीतून प्रत्यक्ष ऊपसा केल्यास कंपनी शेजारील गावांना पाणी मिळेल व पाण्याची पातळी खाली जाणार नाही. त्याबाबत सदरहू प्रकल्पास सूचना देण्यात याव्यात | |
| ५) | सांडपाण्याची आरसीसी टाकीत साठवण करण्यात यावी, जेणेकरुन पावसाच्या पाण्याबरोबर ते शेतात मिसळू नये. कारण येथे गातेस गावातील शेती ही प्रकल्पाच्या खालच्या बाजूस आहे. प्रकल्प प्रशासनास प्रदूषण नियमांचे | |

| | | |
|---|---|---|
| | काटेकोर पालन करण्याची सूचना करण्यात येऊन प्रकल्प विस्तारिकरणास परवानगी द्यावी अशी जाहिर मागणी करतो. | |

५) **<u>श्री अमोल दामोदर पाटील, पंचायत समिती सद्स्य,माजी उप सभापती:-</u>**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | सदरहू कंपनी माझ्या मतदार संघात आहे. तरी मतदार संघातील लोकांच्या अडीअडचणी मांडणे गरजेचे आहे. म.प्र.नि.मंडळ, कल्याण यांनी सदरहू कंपनीतील पाणी हे पिण्यायोग्य नाही असा दाखला दिलेला आहे. | |

| | | |
|---|---|---|
| २) | पंचायत समिती,आरोग्य विभाग यांच्या सन २०२० पत्रानुसार त्यांनी मान्य केलेले आहे की प्रकल्प परिसरात मोठ्या प्रमाणात वासाचा उपद्रव/दुर्गंधी आहे. कंपनीच्या कंपाऊंडला लागूनच श्री परशुराम गोतरणे यांचे घर आहे. तेथील घरे ही कंपनीच्या अगोदरची असून नंतर कंपनी आलेली आहे. तर कंपनी शेजारील रहिवाशांना जो त्रास होतो, त्याबाबत उपाययोजना. | |
| ३) | जिल्हाधिकारी, पालघर यांचे पत्र की प्रकल्प परिसरात खूप मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते. | |
| ४) | गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांचे सन २०२० चे पत्र प्रदूषण मोठ्या प्रमाणात होते. तर अनेक वेळा विविध शासकीय विभागांनी प्रदूषणाबाबत गंभीर सूचना | |

| | | |
|---|---|---|
| | देऊनही प्रकल्प प्रवर्तकांनी त्याबाबत उपाययोजना केलेल्या नाहीत. | |
| ५) | ग्रामपंयायत गातेश यांनी गावठाणापासून प्रकल्पाचे अंतर हे ५०० मीटर्स ठेवले नाही. ते अत्यंत गरजेचे आहे. कार्यरत प्रकल्पा हा निवासी घरांना लागूनच आहे. त्या ५०० मीटर्सच्या आत जिल्हा परिषद शाळा व आंगणवाड्या आहेत. प्रदूषणाची झळ ही सर्वात जास्त त्यांनाच बसणार आहे. | |
| ६) | प्रकल्पापासून नदीचे अंतरही एक कि.मी.पेक्षा कमी आहे. वाडा तालुका औद्योगिक क्षेत्र हे घोषित व अधिसूचित केले असले तरी येथे अगिशामक यंत्रणा ही अस्तित्वात नाही. काही दिवसांपूर्वी गाते गावाजवळील कोनसे गावात बॉयलरचा स्फोट होऊन एका | |

| | | |
|---|---|---|
| | व्यक्तीचे निधन झाले. अशा घटनांना जबाबदार कोणास धरण्यात येईल? त्यासाठी वाड्यात अग्निशामक यंत्रणा अस्तित्वात असण्याची गरज आहे. | |
| ६) | प्रकल्प प्रशासन सांडपाण्याचा निचरा कसा करणार, प्रकल्पात निर्माण होणा-या कच-याची (Wastage) विल्हेवाट कशा प्रकारे करण्यात येईल, कंपनी अस्तित्वात आल्यापासून कुठल्याही प्रकारे परिसरातील गावांमध्ये सीएसआर निधी वापरण्यात आलेला नाही. तर स्थानिकांनी प्रकल्पाचा त्रासच सहन करायचा का?तरी या तीन प्रश्नांची उत्तरे देण्यात यावीत. | आयोजक यांनी प्रकल्प प्रवर्तकांना स्पष्टीकरण देण्याची सूचना केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांडपाण्याबाबत उत्तर देताना स्पष्टीकरण दिले की सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण प्रकल्प म्हणजे झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असून उत्पन्न होणारे सांडपाण्यावर प्रकल्पातच प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करण्यात येतो. त्यांनी सांगितले की वाड्यात पाणी कमी असल्याने आम्हांला प्रकल्पातच सांडपाण्यावर प्रक्रिया करुन पुनर्वापर करणे हे गरजेचे आहे. प्रकल्प अधिकारी यांनी प्रतिपादन |

| | | |
|---|---|---|
| | | केले की प्रकल्पातून एकही थेंब प्रकल्पाबाहेर सोडला जात नाही. दुसरा मुद्दा कच-याची (wastage)विल्हेवाट. तर प्रकल्पातील घातक घनकचरा (Hazardous Solid Waste) हे तळोजा येथील अधिकृत संस्थेस (Recycler)पाठविण्यात येईल. तर सीएसआर निधी साठी ४८ लाखाचा निधी दाखविला आहे, यावेळी श्री अमोल पाटील यांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्प कार्यान्वित झाल्यापासून का केले ते सांगावे. प्रकल्प प्रवर्तक यांनी सूचविले की सीएसआर निधी खर्च करण्यासाठी स्थानिकांची प्रकल्प प्रवर्तकां बरोबर एक संयुक्त समिती (Joint Committee) गठित करण्यात येउन सीएसआर निधी कशाप्रकारे व कोठे खर्च करण्यात यावा याबाबत धोरण ठरविता येईल. |

६) **श्री नरेश आकरे, माजी जिल्हा परिषद सदस्यः -**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | पूर्वी चुका झालेल्या असतील. मात्र असे निदर्शनास येते की ब-याच कंपन्या सीएसआर निधी खर्च करत नाहीत. येथील ब-याच प्रकल्पात स्थानिक लोक काम करतात. चांगल्याप्रकारे रोजगार दिला जातो. २-५% लोक प्रकल्पास विरोध करतात. त्यांना त्रास होत असेल, ते नाकारता येणार नाही. त्याच निदान हे शासकीय प्रशासनाने करायचे | |

| | | |
|---|---|---|
| | आहे. मात्र तेथे विविध लोकप्रतिनिधींच्या भेटी व पाहणी झालेली आहे. विविध पक्षांच्या प्रतिनिधींसुध्दा भेटी दिलेल्या आहेत. कंपन्यांच्या उत्पादन प्रक्रियेत ब-याच प्रमाणात सुधारणा झालेल्या आहेत. तरी पर्यावरण समितीने भेट देऊन पाहणी करावी. सदरहू प्रकल्पाचे समर्थन करणारी विविध पक्षांच्या पत्रांचे अवलोकन करण्यात यावे. प्रकल्पास काही सूचना देणे असल्यास त्या देण्यात याव्यात. बरेच स्थानिक पुढारी, लोकप्रतिनिधी हे प्रतिष्ठेपोटी कंपन्यांकडून काही वेगळी अपेक्षा करतात. वाडा औद्योगिक विकास संघटनेच्या याबाबत तक्रारी आहेत. वाड्यामध्ये शेतीमध्ये कोणी रस घेत नाहीत. या | |

| | | |
|---|---|---|
| | कंपन्या जर बंद झाल्या, तर लोकांना कल्याण, ठाणे येथे जावे लागते. वाड्यातून एक नाला जातो, त्यात अख्ख्या वाड्याची दुर्गंधी पसरलेली आहे. वाड्यात ब-याच ठिकाणी काळे पाणी दिसते. ते तपासण्यात यावे. १०० लोकांचा रोजगार आहे आणि इतर कामेही असतील आणि झाडे चांगली होत असतील, वरच्या बाजूच्या बोअरिंगला खराब पाणी येत असेल, तर एक कि.मी.च्या कंपन्या बघण्यात याव्यात. | |

७) **<u>श्री दीपक टोलुराम पाटील, राहणार-गातेश खुर्द, तालुका-वाडा, जिल्हा-पालघरः-</u>**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १) | गेले १२ वर्षे मी ही कंपनी पाहत आहे. कंपनीने चांगल्या प्रकारे विस्तार केलेला आहे. माझे एकच म्हणणे आहे की श्री दळवी यांनी सांगितले आहे की कंपनीचा मालक दाखवा. माझ्या दोन नर्सरी आहेत. तर येथे वनस्पती व पानांवर काहीही त्रास/विघटन झालेले नाही. त्या रोपवाटिका चांगल्याप्रकारे आहेत. माझा बोअर वेलचा व्यवसाय आहे. पाणी कोठूनही रस्ता काढते. एका नर्सरीसाठी वैतरणा नदीतून पाणी आणलेले आहे. दुसरी नर्सरी ही बोअरवेलची आहे. तर भूगर्भातील जमिनीत क्षार हे असतातच. तरी माझी विनंती आहे की सदरहू प्रकल्पास विस्तारिकरण करण्यासा परवानगी देण्यात यावी. | |

आयोजक यांनी उपस्थित महिला वर्गास काही सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले.

८) **<u>श्री मनोज मंगेश गोतारणे, राहणार-गातेस, तालुका-वाडा. जिल्हा-पालघरः-</u>**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| | स्थानिकांना प्राधान्य दिले जाते असे सांगण्यात आले. श्री धनाजी गोतारणे या मुलाला अपघात झाला. पण आता तो नोकरीस गेला तर त्यास तुला काम जमणार नाही असे सांगितले. त्यास दोन मुले आहेत, तो सुरक्षा विभागात काम करतो. | **सदस्य यांनी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविण्याची सूचना केली. प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की सुरक्षेच्या दृष्टीने संबंधित व्यक्तीस ते काम देता येणार नाही. मात्र संबंधित व्यक्तीस निश्चितच न्याय देण्यात येईल.** |

तहसीलदार, वाडा तहसील, जिल्हा-पालघर यांनी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थित केलेल्या

इतर काही मुद्दे असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत. सरपंच यांनी इतर मुद्द्यांबाबत बैठक लावण्याचे आश्वासन देण्यात आले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन सांगितले की ही कंपनी खूप दिवसचालत असून विस्तारिकरण आहे. स्थानिकांना बरेच मुद्दे उपस्थित आहेत. कंपनीने पर्यावरण अहवाल उपलब्ध केलेला आहे. भविष्यात जर कंपनीने दिलेली आश्वासने पूर्ण केली नाही, तर त्याबाबत प्रशासन हे त्यावेळेस पुढील कार्यवाही करत असते. त्यांनी पदाधिका-यांना पर्यावरण अहवाल उपलब्ध करण्याची सूचना केली. अध्यक्ष यांनी सादरीकरण उपलब्ध करण्याची सूचना केली. त्यांनी सांगितले की वरिल सर्व पर्यावरणीय उपाययोजना करणे प्रकल्प प्रशासनास बंधनकारक आहे. ही समिती कुठलाही निर्णय घेत नाही. सदरहू बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद इतिवृतात घेण्यात येऊन ते इतिवृत मराठी व इंग्रजीत तयार करुन अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकना अहवाल सोबत, प्रकल्प समर्थाची पत्रे, लेखी सूचना, आक्षेप यांच्यासह अध्यक्षांच्या संमतीने म.प्र.नि. मडळ मुख्यालयातर्फे पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येतात. तेथील तज्ज्ञ

समिती त्याबाबत योग्य तो निर्णय घेते. जर कंपनीने आश्वासन पाळले नाही, तर जिल्हा प्रशासन त्याबाबत कंपनीस विचारणा करु शकते. सीएसआर व सीईआरबाबत निर्देश पाळणे हे कंपनीचे कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे स्थानिकांशी सलोख्याचे संबंध ठेवणे ही कंपनीची जबाबदारी आहे. स्थानिकांना रोजगार देताना स्थानिकांना कौशल्यविकास कार्यक्रम राबवविणे ही कंपनीने काळजी घेणे गरजेचे आहे. येथील तहसीलदार व प्रांत अधिकारी यांनाही निर्देश देण्यात येतात की येथील स्थानिक कंपन्यांची बैठक ते बोलावू शकतात. स्थानिकांना रोजगार देण्यास कंपन्यांना ते आदेशही देऊ शकतात. कंपनीची जबाबदारी आहे की स्थानिकांना कौशल्यविकास कार्यक्रम राबवविणे. तर तहसीलदार, प्रांत अधिकारी यांना याबाबत सूचना देण्यात येतात व अध्यक्ष या नात्याने जनसुनावणी संपन्न् झाल्याचे जाहिर केले.

अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी संस्थगित करण्यात आली.

यांची यादी सोबत क्रं.-२ (७० पत्रे) तसेच प्राप्त लेखी आक्षेप सोबत क्रं-३ जोडण्यात आलेले आहेत.

**(देविदास कोपरकर)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
कल्याण-३,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कल्याण

**(बाबासाहेब कुकडे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कल्याण

**(दिलीप गुट्टे)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, पालघर,
जिल्हा-पालघर